**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ६७/२०१९** **दिनांक २०/०८/२०१९** **कालावधी ५ दिवस**

**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १४/०८/२०१९ ते २०/०८/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २१/०८/२०१९ सकाळी ८:३० पासून २५/०८/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १४/०८ | १५/०८ | १६/०८ | १७/०८ | १८/०८ | १९/०८ | २०/०८ | | २१/०८ | २२/०८ | २३/०८ | २४/०८ | २५/०८ |
| २ | ३ | २ | २ | २ | १२ | - | **पाऊस (मिमी)** | २ | १४ | ४ | ३ | ४ |
| २९.८ | ३०.० | ३१.२ | ३१.६ | ३२.२ | ३२.४ | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३२ | ३२ | ३१ | ३२ | ३२ |
| २५.५ | २५.५ | २५.३ | २५.६ | २५.० | २५.८ | - | **किमान तापमान (अं.से)** | २६ | २६ | २५ | २५ | २६ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ८ | ७ | ८ | ६ | ८ |
| - | ९९ | ९९ | ९९ | ९९ | ९९ | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९१ | ९१ | ९० | ९२ | ९१ |
| ९९ | ९७ | ९६ | ८६ | ८५ | ८७ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ६९ | ७१ | ७५ | ६९ | ७१ |
| २ | १ | ५ | ५ | ३ | ० | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ५ | ७ | ८ | ९ | ८ |
| १७९ | १६९ | २३९ | २०५ | १५९ | २५९ | - | **वाऱ्याची दिशा** | नै. | नै.द. | प. | प. | नै.प. |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक २१ ते २५ ऑगस्ट २०१९ पर्यंत हलक्या स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश ढगाळ राहील.**

**दिनांक २३ ते २९ ऑगस्ट, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा कमी राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **फुटवे अवस्था** | • पर्जन्यमान कमी असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी.पर्यंत ठेवावी.<br>• पुढील पाच दिवस ढगाळ वातावरण असून पाउसाची उघडीप असण्याची शक्यता असल्यामुळे पाणथळ भागात लावलेल्या भात पिकावर पाणी साठून राहिल्यामुळे निळे भुंगेरेचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पिकाचे सातत्याने निरीक्षण करून किडीच्या प्रादुर्भावाकडे लक्ष ठेवावे. खाचरातील पाणी जास्त काळ न साठवता २-३ दिवसांच्या अंतराने जुने पाणी बाहेर काढण्याची आणि नवीन पाणी खाचरात घेण्याची व्यवस्था करावी. पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत ठेवावी. निळे भुंगेरे या किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही ४० मि.ली. किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के प्रवाही १२.५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.<br>• भात पिक पुर्नलागवडीनंतर एक महिन्याने गरजेनुसार बेणणी आणि खुरपणी करून भात पिकास फुटवे येण्याच्या अवस्थेत नत्र खताचा दुसरा हप्ता हेक्टरी ८७ किलो युरिया या प्रमाणात देण्यात यावा. |
| **आंबा** | **पालवी** | • वाढत्या तापमानामुळे आंब्याला पालवी फुटण्यासाठी पोषक वातावरण तयार होत असून पालवीचे किडी आणि रोगांपासून पासून संरक्षण करण्यासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. + बाविस्टीन २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **काजू** | **वाढीची अवस्था** | • गेल्या काही दिवसात झालेल्या अति पाउस आणि त्यामुळे वाढलेली आर्द्रता आणि कमी सूर्यप्रकाश यामुळे बुरशीला पोषक वातावरण निर्माण झाल्यामुळे काजूची मोठ्या प्रमाणावर पानगळ आणि फांद्याची मर दिसून येत आहे. यासाठी मेटॅलक्झील ८ टक्के + मॅन्कोझेब ६४ टक्के या संयुक्त बुरशीनाशकाची २० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून संपूर्ण झाडावर फवारणी करावी. |
| **भाजीपाला पिके** | **फळधारणा** | • भेंडी पिक क्षेत्रात गरजेनुसार बेणणी करून प्रति गुंठा क्षेत्रास ७२० ग्रॅम युरिया खताची मात्रा लागवडीनंतर ६० दिवसांनी देण्यात यावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**